|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University Jalgaon

'A' Grade NAAC Re-Accredited (4th Cycle)

**संलग्नता विभाग**

जा.क्र. कबचौउमवि /५/संलग्नता/७४/२०२५

दि २२.०३.२०२५

**प्रति,**

**कबचौउमविशी संलग्नीत सर्व कला, वाणिज्य, विज्ञान,**

**समाजकार्य, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, विधी, औषधनिमार्णशास्त्र महाविद्यालये,**

**मान्यताप्राप्त परिसंस्था यांचे मा. प्राचार्य व मा. संचालक व**

**विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्व प्रशाळेंचे मा. संचालक यांना .....**

**विषय:-** महाविद्यालयात / परिसंस्थेत सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे बाबत तसेच मुलींच्या सुरक्षेसाठी विद्यापीठ परिसरासह प्रत्येक महाविद्यालयात विद्यार्थीनींच्या सुरक्षीततेसाठी पथक नियुक्त करणेबाबत.....

**महोदय / महोदया,**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने दि. १६ मार्च २०२३ रोजी दि. २८ सप्टेंबर,२०२४ रोजी संपन्न झालेल्या मा. अधिसभेच्या सभेत झालेल्या चर्चेनुसार व ठरावानुसार विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये / परिसंस्था व विद्यापीठांतर्गत प्रशाळा यांनी सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत ठराव परित करण्यात आलेला आहे.

१) महाविद्यालयात, वर्ग खोल्या, व्हरांड्यात, परिसरात, व महाविद्यालयात ज्या- ज्या ठिकाणी परिक्षेचे गोपनिय कामकाज सुरू असेल अशा ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्या संदर्भात सूचना देण्यात याव्यात. तसेच या बाबत LIC Committee Report मध्ये याचा उल्लेख करावा.

२) मुलींच्या सुरक्षेसाठी विद्यापीठ परिसरासह प्रत्येक महाविद्यालयात दामिनी पथक तयार करावे. या संदर्भात प्रत्येक महाविद्यालयातील अंतर्गत सुरक्षा पथकांना सूचना देण्यात याव्यात.

तरी मा. अधिसभेच्या सभेत घेण्यात आलेल्या उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने वर्ग खोल्या, व्हरांड्यात, परिसरात व महाविद्यालयातील ज्या- ज्या ठिकाणी परिक्षेचे गोपनीय कामकाज सुरू असेल अशा ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत. तसेच विद्यार्थीनीच्या व महिलांच्या सुरक्षिततेसाठी दामिनी पथकाची नियुक्ती करण्यात यावी.

वरील बाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यापीठास सादर करण्यात यावा, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

उपकुलसचिव
(संलग्नता विभाग)

**प्रत :-**

१)मा.कुलगुरू कार्यालय, कबचौउमवि, जळगांव

२)मा. प्र-कुलगुरू कार्यालय, कबचौउमवि, जळगांव

३)मा.कुलसचिव, कबचौउमवि, जळगांव

४)उपकुलसचिव,सभा व दप्तर विभाग, कबचौउमवि,जळगांव